# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 14 May 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १४ मे २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून दहशतवादी तळच नव्हे तर दहशतवाद्यांचे मनसुबे आणि दु:साहसही धुळीस मिळवल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
- ऑपरेशन सिंदूर बाबत जनजागृतीसाठी भारतीय जनता पक्षाची देशभर `तिरंगा यात्रा`
- देशाचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण गवई आज पदभार स्वीकारणार
- बेघर बालकांच्या पुनर्वसनासाठी फिरते पथक योजनेला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी –कृत्रीम वाळू धोरणालाही मान्यता
- राज्य शिक्षण मंडळाचा दहावीचा तसंच सीबीएसईचा बारावी आणि दहावीचा निकाल जाहीर

आणि

- नैर्ऋत्य मोसमी पाऊस दक्षिण अंदमान समुद्रात दाखल

****

ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून फक्त दहशतवादी तळच नव्हे तर दहशतवाद्यांचे मनसुबे आणि दु:साहसही धुळीस मिळवल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. पंतप्रधानांनी काल पंजाबात आदमपूर इथं वायूदलाच्या तळाला भेट देऊन सैनिकांशी संवाद साधला, पाकिस्तानात दहशतवादी लपून राहू शकतील, अशी जागा आता उरली नसल्याचं त्यांनी नमूद केलं.

देशाच्या सैनिकांच्या या अतुलनीय कामगिरीबद्दल संपूर्ण देश कृतज्ञ असल्याची भावना पंतप्रधानांनी व्यक्त केली. सैनिकांचं कौतुक करतांना पंतप्रधान म्हणाले...

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

****

`ऑपरेशन सिन्दूर` बाबत जनजागृतीच्या उद्देशानं भारतीय जनता पक्षानं कालपासून देशभरात जनजागृती मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेला `तिरंगा यात्रा` असं नाव देण्यात आलं असून, यातून, पाकिस्तानच्या विरोधात भारतीय लष्करानं केलेल्या यशस्वी कारवायांवर प्रकाश टाकण्यात येणार आहे. राजधानी दिल्लीतल्या कर्तव्यपथावर आज संध्याकाळी यानिमित्तानं विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

देशाचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून भूषण गवई आज पदभार स्वीकारणार आहेत. सरन्यायाधीश संजीव खन्ना काल सेवानिवृत्त झाले. गेल्या वर्षीच्या चोवीस नोव्हेंबरला त्यांनी हा पदभार स्वीकारला होता. न्यायमूर्ती खन्ना यांनी आपले उत्तराधिकारी म्हणून न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या नावाची शिफारस केली होती.

****

राज्यातल्या, रस्त्यावर राहणाऱ्या बालकांच्या पुनर्वसनासाठी फिरते पथक, ही योजना राज्यात राबवण्याला काल मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. या योजनेसाठी राज्यातल्या एकोणतीस महापालिका क्षेत्रांमध्ये एकतीस मोबाईल व्हॅन्स घेण्यासाठी आठ कोटी रुपयांच्या निधीलाही मान्यता देण्यात आली.

पर्यावरणाची हानी टाळण्याच्या दृष्टीनं राज्यात कृत्रीम वाळू अर्थात एम सँड धोरणाला मान्यता देण्यात आली आहे, प्रत्येक जिल्ह्यात पन्नास व्यक्ती किंवा संस्थांना एम सँड प्रकल्प स्थापन करण्यासाठी उद्योग विभागाद्वारे सवलती देण्यात येतील तसंच अशा प्रत्येक प्रकल्पाला प्रति ब्रास दोनशे रुपयांची सवलत देण्याचा निर्णयही मंत्रिमंडळानं कालच्या बैठकीत घेतला.

राज्य वेतन त्रुटी निवारण समितीनं सादर केलेला अहवाल स्वीकारत, त्यासाठीचा ऐंशी कोटी रुपयांचा भार राज्य शासनानं स्वीकारण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

राज्यातल्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना जागतिक दर्जाच्या प्रशिक्षण केंद्रांत रूपांतरित करण्यासाठी सार्वजनिक-खाजगी भागिदारीतून अद्ययावतीकरण धोरण राबवण्याला मंत्रिमंडळानं मंजुरी दिली.

****

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ, सीबीएसीईच्या दहावी आणि बारावी परीक्षांचा निकाल काल जाहीर करण्यात आला. बारावीच्या परीक्षेत ८८ पूर्णांक ३९ टक्के विद्यार्थी तर दहावीच्या परीक्षेत त्र्याण्णव पूर्णांक सहासष्ट टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. सीबीएसईच्या निकालातही मुलींनी बाजी मारली आहे. www.cbse.gov.in या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांना आपला निकाल पाहता येणार आहे.

**

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावीच्या परीक्षांचे निकाल काल जाहीर झाले. राज्यात एकूण ९४ पूर्णांक १० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून परीक्षेतले सर्व उत्तीर्ण विद्यार्थी, त्यांचे पालक आणि त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक यांचं, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी अभिनंदन केलं आहे. उत्तीर्ण न होऊ शकलेल्या विद्यार्थ्यांनी नाउमेद न होता पुरवणी परीक्षेस प्रविष्ट होऊन यश संपादन करावं, असं आवाहनही शिक्षणमंत्र्यांनी केलं आहे.

दहावीच्या या निकालाबाबत सविस्तर माहिती देणारा हा वृत्तांत..

***"दहावीच्या यंदाच्या परीक्षेत पुणे विभागाचा निकाल ९४ पूर्णांक ८१ शतांश, नागपूर – ९० पूर्णांक ७८, छत्रपती संभाजीनगर ९२ पूर्णांक ८२, मुंबई ९५ पूर्णांक ८४, कोल्हापूर – ९६ पूर्णांक़ ७८, अमरावती – ९२ पूर्णांक ९५, नाशिक – ९३ पूर्णांक ०४, लातूर – ९२ पूर्णांक ७७ तर कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक म्हणजे ९८ पूर्णांक ८२ शतांश इतका लागला आहे.***

***छत्रपती संभाजीगर विभागात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा निकाल ९३ पूर्णांक ६० शतांश, जालना ९१ पूर्णांक ४४, बीड ९६ पूर्णांक ४७ शतांश, परभणी ८९ पूर्णांक २४ शतांश तर हिंगोली जिल्ह्याचा निकाल ८९ पूर्णांक ०७ शतांश एवढा लागला आहे.***

***लातूर विभागात यावर्षी धाराशिव जिल्हा ९५पूर्णांक ३७ शतांश निकालासह सर्वप्रथम आला आहे. लातूर जिल्हा ९२ पूर्णांक ३६ शतांश घेऊन द्वितीय तर नांदेड जिल्हा ९१ पूर्णांक ९३ शतांश निकालासह घेऊन तृतीय क्रमांकावर आला आहे."***

*आकाशवाणी बातम्यांसाठी हर्षवर्धन दीक्षित आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर*

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या एकूण १७ माध्यमिक शाळांमधले ८२१ विद्यार्थी दहावीच्या परीक्षेला बसले होते, त्यातील ६३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

****

शेतकऱ्यांच्या सोयीसाठी आणि त्यांना शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणाहून देण्यासाठी ॲग्रीस्टॅक उपक्रमांतर्गत ३१ मे पर्यंत नोंदणी करावी, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. बावनकुळे यांनी काल नागपूर इथून दूरदृष्य प्रणालीद्वारे खरीप हंगामाचा आढावा घेतला. ही नोंदणी केली नसलेल्या शेतकऱ्यांना वीज बिलाची सवलत मिळणार नसून त्यांना जुलैपासून विजबिल देण्यात येईल असं त्यांनी सांगितलं.

****

रासायनिक खतांवरचं शेतीचं अवलंबित्व कमी करत जैविक खतांचा वापर वाढवण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याचे निर्देश परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिले आहेत. काल परभणी इथं खरीप हंगाम २०२५च्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. फळबाग लागवड योजना आणि रेशीम शेती बाबत जनजागृती करण्याच्या सूचना बोर्डीकर यांनी यावेळी दिल्या. येत्या १५ दिवसांत जिल्ह्यातल्या शेतरस्त्यांची कामं पूर्ण करण्याचे, तसंच कृषी निविष्ठा उपलब्ध असल्याची खात्री करण्याचे आदेशही पालकमंत्र्यांनी यावेळी दिले.
दरम्यान, परभणी इथं पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांची तयारी सुनिश्चित करण्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची काल आढावा बैठक झाली.

****

सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने ११५ पदकांसह पदकतालिकेतलं अव्वल स्थान कायम ठेवलं आहे. यात ४३ सुवर्ण, ३७ रौप्य आणि ३५ कांस्यपदकांचा समावेश आहे. जिमनॅस्टिक्स स्पर्धेत महाराष्ट्राच्या परिना हिने सुवर्णपदक जिंकलं आहे. याच स्पर्धेत महाराष्ट्राच्या देवांगी पवार हिने कांस्य पदकाची कमाई केली. बॉल जिमनॅस्टिक्स स्पर्धेत महाराष्ट्राच्या किमया कारळे हिने सुवर्ण पदक जिंकलं असून परिनाला रौप्य पदक मिळालं आहे.

****

हवामान

नैर्ऋत्य मोसमी पावसानं बंगालच्या उपसागरातला दक्षिण भाग व्यापला असून दक्षिण अंदमान समुद्र, निकोबार बेटं आणि उत्तर अंदमान सुद्राच्या काही भागात तो पोहोचला आहे. पुढच्या ३-४ दिवसात मान्सून आणखी पुढं सरकेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

****

राज्यात काल सर्वाधिक ४० पूर्णांक सहा दशांश सेल्सिअस तापमान अकोला इथं नोंदवलं गेलं. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर इथं ३४ अंश, धाराशिव ३५ पूर्णांक आठ, तर बीड आणि परभणी इथं ३८ अंश सेल्सिअसपेक्षा अधिक तापमानाची नोंद झाली.

दरम्यान, उत्तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस, पडण्याची शक्यता हवामान विभागाने नोंदवली आहे.

****

अंबाजोगाई इथं मराठी भाषेच्या विद्यापीठाचं उपकेंद्र व्हावं, शिवार साहित्य संमेलनासारख्या लहान साहित्य संमेलनाला अनुदान देण्यात द्यावं, यासह १२ ठराव संमत करुन काल माजलगाव इथं १६ व्या शिवार साहित्य संमेलनाचा समारोप झाला.

****